कल्याण डोंबिवली महानगरपालिका

नगर रचना विभाग

अटी व शर्ती

सुधारीत बांधकाम परवानगी क्र.KDMC/TPD/BP/KD/2018-19/49/32

Date 30/04/202

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार मौजे--मोहने, स.नं.६०, हि.नं.६, स.नं.६६/२/२, ३/२, ४/२, सि.स.नं.४४३१, ४४३३ मध्ये ६३१५.०० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडावर १८४८.४६ चौ.मी. जिना अधिमुल्य क्षेत्रासह एकूण ७९१९.७२ चौ.मी. बांधकाम क्षेत्रास दि. १८/०१/२०१९ अन्वये बांधकाम प्रारंभ परवानगी देण्यात आली आहे, सद्यस्थितीत UDCPR नुसार Additional Premium FSI Basic FSI व Premium FSI चा विचार करुन एकूण ९०४३.१८ चौ.मी. बांधकाम क्षेत्राच्या भुखंडाचा विकास करणेसाठी सुधारित बांधकाम करण्यासाठी केलेल्या दिनांक ०५/०४/२०२१ च्या अर्जास अनुसरुन खालील अटी व शर्तीस अधिन राहून, तसेच नकाशावर हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे "सुधारीत बांधकाम परवानगी" देण्यात येत आहे.

बांधकामाचा तपशील :--

इमारत-- स्टीलुट(पं.), तळ(पं.)+पहिला मजला ते पंधरावा मजला मजला (रहिवास + वाणिज्य)

इमारत--स्टील्ट(पं.),तळ(पं.)+पहिला मजला ते तिसरा मजला (क.डों.म.पा.करीता--क्षेत्र ५०४.७६ चौमी)

१) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील विनियम क्र. २.८.३ नुसार प्रत्यक्ष जागेवर बांधकाम सुरु करणेपुर्वी बांधकाम मंजुरीचा फलक लावणे आपणांवर बंधनकारक राहिल.

२) UDCPR मधील विनियम क्र.1.5 Savings मध्ये नमूद a to h बाबत शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या मार्गदर्शक सूचना आपणांवर बंधनकारक राहील.

३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

४) UDCPR मधील Appendix-F नुसार वाडेभिंत व जोत्याचे बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे व त्यानंतरच पुढील बांधकाम करण्यात यावे.

५) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये, तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची विकास परवानगी रद्द समजण्यात येईल.

६) UDCPR मधील विनियम क्र. १२.१ ते १२.३ नुसार इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी वास्तुशिल्पकार, Structural Enineer व मुखत्यारधारक यांचेवर राहिल, याची नोंद घ्यावी.

७) इमारतीकडे जाण्या--येण्याच्या मार्गाची जबाबदारी संपूर्णपणे आपलेकडे राहिल. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्रस्तावित रस्त्याप्रमाणे दिले असल्यास त्या रस्त्याचे काम महानगरपालिकेच्या सोयी प्रमाणे व निधीच्याप्रमाणे केले जाईल व तसा रस्ता होईपर्यंत इमारतीकडे येणा--जाण्याचे मार्गाची जबाबदारी सर्वस्वी आपली राहिल.



कल्याण डोंबिवली महानगरपालिका जि. ठाणे KALYAN DOMBIVLI MUNICIPAL CORPORATION DIST. THANE
JOINT SUB REGISTRAR CLASS-2
कलन-२ नं.२
क्र. ८००२ | २०२३
६८ | ८१